जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२०/११/२०२३
## दि.१९/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २३२/२०२३,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २० वर्षे,रा.२४३,मंगळवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | १.श्रीराज सोनू भारत पाटोळे,वय-१९,रा.२५१,मंगळवार पेठ,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/११/२०२३ रोजी ०१/४५ वा.२५१,सार्वजनिक शौचालया शेजारी,लाकडी वखारी समोर,मंगळवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ओळखीचा प्रतिक ऊर्फ लल्या पृथ्वीराज कांबळे,वय-३१ वर्ष,रा.२५१, मंगळवार पेठ,पुणे व इतर साथीदार यांचेसह त्यांचे वस्ती मधील सार्वजनिक शौचालया बाहेरील बाजुस असलेल्या लाकडाचे वखारी जवळ लघुशंका करीत असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,अचानकपणे पळत येवून प्रतिक ऊर्फ लल्या यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने, त्याचे डोक्यावर,तोंडावर त्यांचे हातातील फरशीने मारली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास अडविले असता,त्याने सोड मला,मी खुप वैतागलो आहे,मला काय त्रास आहे मलाच माहित आहे असे म्हणुन जखमी अवस्थेत पडलेल्या प्रतिक ऊर्फ लल्या याचे डोक्यात तेथेच कबुतरांचे पाणी पिण्यासाठी असलेली दगडी उखळ घालुन,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), श्री.मंगेश जगताप ८८३०५५२२५५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७४५/२०२३,भादविक ३९४,५०६,५०४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ३३ वर्षे,रा.आंबेगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | विशाल कांबळे,वय २४ वर्षे,रा.आंबेगाव-बुद्रुक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/११/२०२३ रोजी ०१/०० ते ०१/१५ वा.चे दरम्यान वडगाव पुलाखालुन ते स.नं.४/१८/२१ स्प्रिंग फिल्ड सोसायटी,आंबेगाव-बुद्रुक,पुणेचे मेनगेट पर्यत |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मोटार सायकलवरून नमुद ठिकाणावरून जात असताना,त्यांनी नमुद इसम विशाल कांबळे यास लिफ्ट दिली असता,त्याने फिर्यादीस मी आत्ता एकाला मारुन आलो आहे,मला पैसे दे नाहीतर,मी तुला पण मारीन असे धमकावुन जबरदस्तीने फिर्यादी यांचे खिशा मधील रोख १,०००/- रु काढुन घेवुन फिर्यादीस मारहाण करण्याची धमकी देवुन,तेथे जमलेले नागरीक हे फिर्यादी यांचे मदतीला पुढे येवु लागले असता,त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. कथले ९६६५२१०३४५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५६४/२०२३,भादविक ३०२,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | रूपेश शिंदे,वय ४९ वर्षे,रा.आंबेगांव पठार,कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | अनिकेत मुकुंद परदेशी,वय २८ वर्षे रा.अभिनव कॉलेज रोड नंदनवन सिटी,न-हे,पुणे (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/११/२०२३ रोजी दु.१५/२५ चे पुर्वी सर्वे नं.१५ लगत,न-हे डोगंराचे पायथ्याला, स्वामीनारायण मदिंराचे मागे,न-हे,पुणे येथील मोकळया पडीक जागेत. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा सौरभ रुपेश शिंदे,वय २३ वर्षे,रा.राम मंदिर लेन नं.२,आंबेगांव पठार,कात्रज,पुणे याचा नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने,अज्ञात कारणावरुन, कोणत्या तरी कठीण वस्तुने,त्याचे कपाळावर,तोंडावर व डोक्यावर घाव घालुन,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.राहूल यादव ९५५२१६०७२०. |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७४७/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-५६ वर्षे,रा.बोपगांव,ता.पुरंदर,जि.पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/११/२०२३ रोजी १८/०० ते दि.१९/११/२०२३ रोजी १०/३०वा.चे दरम्यान जैन विवाह संस्था, सुंदरबन सोसायटी, कात्रज कोंढवा रोड पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची नमुद ठिकाणी विवाह संस्था असून,त्या विवाह संस्थेचें ऑफिस कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने ते कशाचे तरी सहाय्याने तोडुन आत प्रवेश करुन ऑफीसचे कपाटा मध्ये ठेवलेली एकुण ०३,८०,५००/- रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिण्याची चोरी केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अविनाश ढमे ९४०५२६२०७४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७४६ /२०२३,भादविक ३०६,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४७ रा.शिवदर्शन अपार्टमेंट,आंबेगाव-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | एका खासगी बँकेंचे मॅनेजर व इतर दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/११/२०२३ चे पुर्वी फ्लॅट नं.१०३,शिवदर्शन अपार्टमेंन्ट,साई मंदीराजवळ,आंबेगाव-बुद्रुक,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मयत पती बजरंग शिंदे यांनी यातील नमुद एका खासगी बँकेंचे मॅनेजर व इतर दोन इसम यांचेकडुन घेतलेल्या रक्कमेपेक्षा जादा रकमेसाठी त्यांनी आपआपसात संगनमत करुन,बजरंग शिंदे यास शिवीगाळ करून,जादा रकमेसाठी सतत तगादा लावुन, त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देवुन, त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. स्वप्निल पाटील ९०२१७४७३३६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**